**<u>नियमित दिवाणी मुकदमा नं.३१९/२०२३ - निशाणी २१ लगत आदेश</u>**

प्रतिभा दादासाहेब व्हळगळ वि. मारूती दिगंबर सुतार इ.

CNR No. MHSO20-001229-2023

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ व ७ यांनी त्यांचे विरुध्द झालेला 'विना कैफियत' चा आदेश रद्द होऊन मिळणेसाठी दाखल केलेला आहे. सदर प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे, त्यांना सदरचे वाद मिळकतीसंबंधीचे आवश्यक असणारी जुनी कागदपत्रे मुदतीत मिळाली नाहीत. प्रतिवादींना त्यांची कैफियत मुदतीत देऊ शकले नाहीत. त्यामुळे त्यांचे विरुध्द विना कैफियतचा आदेश झालेला आहे. सदर दावा स्थावर मिळकतीसंबंधीचा असलेमुळे या दाव्याचा गुणानुरूप न्यायनिर्णय होणेचे दृष्टीने प्रतिवादी क्र. १ व ७ यांचेविरुध्द झालेला विना कैफियत चा आदेश रद्द होऊन प्रतिवादी यांनी सोबत दिलेली कैफियत स्वीकारणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक व गरजेचे आहे. अन्यथा प्रतिवादी यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. सबब, प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांचे विरुध्द झालेला 'विना कैफियत' चा आदेश रद्द होऊन त्यांची कैफियत स्वीकारण्याची तसेच अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

२. प्रस्तुत अर्जास वादी त्यांचे म्हणणे मांडले की, अर्जातील मजकूर खोटा व बनावट आहे. सबब, अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती केली. यदाकदाचित अर्ज मंजूर करणेचे झालेस रक्कम रु.५००/- कॉस्ट करणेची विनंती केली.

३. दोन्ही पक्षातर्फे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. दाव्याचे अवलोकन केले असता सदर प्रतिवादी क्र. १ व ७ यांनी मुदतीमध्ये दाव्यात हजर राहून कैफियत दिलेली नाही. त्यामुळे त्यांचे विरुध्द 'विना कैफियत' आदेश झालेला आहे. वादी, प्रतिवादींचे कथन पाहता व दाव्याचा विषय विचारात घेता दोन्ही पक्षकारांना ऐकण्याची संधी देणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. सदरचा अर्ज मंजुर केल्याने दाव्याचा विषय गुणदोषावर निर्गत करणेसाठी मदतच होणार आहे. याउलट अर्ज

नामंजूर केल्याने प्रक्रियात्मक विलंब वाढणार आहे. अर्ज मंजूर केल्याने वादी यांचे नुकसान होणार नाही. विलंबाचे कारण लक्षात घेता सदर प्रतिवादी क्र.१ यांचेवर खर्च ठेवणे उचित होणार नाही. वरील सर्व कारणांचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो -

**<u>आ दे श</u>**

१. प्रतिवादी क्र.१ व ७ यांचा अर्ज (नि.क्र.२१) मंजूर करणेत येतो.

२. प्रतिवादी क्र.१ व ७ यांचे विरुध्द झालेला 'विना कैफियत' चा आदेश रद्द करण्यात येतो.

दिनांक – ०४/०५/२०२४

( सौ. बी. एम. पोतदार )
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, सांगोला.